**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.ज्ञानेश्वर मुरलीधर भोसले
तर्डोबाची वाडी, ता.शिरूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती शिरूर, ता.शिरूर, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत तर्डोबाची वाडी, ता.शिरूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २००२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.ज्ञानेश्वर मुरलीधर भोसले
तर्डोबाची वाडी, ता.शिरूर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती शिरूर, ता.शिरूर, जि.पुणे श्री.पी.डी.आव्हाड

| | |
|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत तर्डोबाची वाडी, ता.शिरूर, जि.पुणे श्री.बी.बी.शेळके | |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१०.३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.४.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्याने दि.११.३.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, तर्डोबाची वाडी, ता.शिरूर, जि.पुणे यांनी दिली. तथापि अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, शिरूर, ता.शिरूर, जि.पुणे यांनी अपिलाची सुनावणी घेतली नाही व निर्णय दिला नाही. त्याविरूध्द अपील केले आहे, असे निवेदन अपीलकर्ता श्री.ज्ञानेश्वर मुरलीधर भोसले यांनी केले.

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, तर्डोबाची वाडी, ता.शिरूर, जि.पुणे यांनी श्री.भोसले यांना माहिती दिली होती. त्यामुळे अपिलावर कार्यवाही केली नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, शिरूर, ता.शिरूर, जि.पुणे श्री.पी.डी.आव्हाड यांनी स्पष्ट केले.

अपीलकर्त्यास माहिती मिळाली. तथापि अपील केल्यास अपिलीय प्राधिकाऱ्यांनी निर्णय कळविणे आवश्यक आहे, याची समज अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, शिरूर, ता.शिरूर, जि.पुणे श्री.पी.डी.आव्हाड यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
28 APR 2010

## सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीय तरतुदीची आवश्यकता दर्शविणारे विवरणपत्र

रुपये हजारात

| कार्यालये | ०१ वेतन | ०३ अतिकालीक भत्ता | ०६ दुरध्वनी वीज पाणी | ११ देशांतर्गत प्रवास खर्च | १२ परदेश प्रवास खर्च | १३ कार्यालयीन खर्च | १७ संगणकावरील खर्च | २० इतर प्रशासकीय खर्च | २८ व्यावसायिक व विशेष सेवा | ५१ मोटार वाहन | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मुख्यालय | ६२६८ | १७१ | १४० | ६०० | ७९९ | १५०० | ३०१ | ३०० | ३०० | ३०० | १०६७९ |
| बृहन्मुंबई | ५८१५ | १ | २५ | ३०० | १ | ९०० | १ | १ | ५० | ० | ७०९४ |
| कोंकण | ५००० | २८ | २०० | २५० | ० | २७०० | २०० | ० | ० | ० | ८३७८ |
| पुणे | १२५०० | ० | ४०० | ६०० | ० | ४७०० | ३०० | ० | ० | ० | १८५०० |
| नागपूर | ४२५८ | ० | ५० | ५०० | | ३१०० | ५०० | | | | ८४०८ |
| औरंगाबाद | ४३२९ | ० | ० | ५०० | ० | १७५० | ५० | ० | ५० | ० | ६६७९ |
| अमरावती | ४१७२ | ० | ६० | ५०० | ० | ६००० | १८२४ | ० | ० | ० | १२५५६ |
| नाशिक | ४१७२ | ० | ६० | ५०० | ० | ६००० | १८२४ | ० | ० | ० | १२५५६ |
| एकूण | ४६५१४ | २०० | ९३५ | ३७५० | ८०० | २६६५० | ५००० | ३०१ | ४०० | ३०० | ८४८५० |

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मिलिंद श्रीधर पोहरे
मु.पो.राजगुरुनगर,ता.खेड,जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,
आंबेगाव तहसील कार्यालय, ता.आंबेगाव, जि. पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,
आंबेगाव तहसील कार्यालय, ता.आंबेगाव, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०१५+१०५८/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.११.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मिलिंद श्रीधर पोहरे
मु.पो.राजगुरुनगर,ता.खेड,जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,
आंबेगाव तहसील कार्यालय, ता.आंबेगाव, जि. पुणे श्री.प्र.सु.पाटील

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,
आंबेगाव तहसील कार्यालय, ता.आंबेगाव, जि. पुणे श्री.व्ही.व्ही.सोनवणे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१४.०३.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.०१.०४.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२२.०४.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१६.०५.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३०.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकात एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१७.११.२००९ रोजी घेण्यात आली.

डिंभे धरणाच्या अंतर्गत पुनर्वसनासाठी जमीन संपादन झाल्याचे ॲवॉर्डमध्ये नमूद केले असूनही फेरफाराच्या नोंदी व त्याबाबतचा तपशील दिला जात नाही. ७/१२ चे उतारे सध्याचे दिले जातात, परंतु त्यावेळचे (सन १९८१) दिले जात नाहीत. मंडल अधिकाऱ्यांकडे असलेल्या जबाबाच्या व पंचनाम्याच्या प्रती दिल्या नाहीत, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.मिलिंद श्रीधर पोहरे यांनी केले.

श्री.पोहरे ज्यांच्या जमिनीबाबत माहिती मागत आहेत, ते श्री.रामचंद्र केशव थिटे व श्री.वसंत केशव थिटे हे त्यांचे नातेवाईक आहेत. त्यांना त्रास देण्यासाठी श्री.पोहरे अशा प्रकारचे अर्ज व अपिले करीत असतात, असे श्री.थिटे यांनी अर्जाद्वारे कळविले आहे. संबंधित जमीन ॲवॉर्डमध्ये संपादित केलेली नाही, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री.पोहरे याना पूर्वीच लेखी कळविलेले आहे. संपादित झालेल्या सर्व जमिनींचे ७/१२ व फेरफाराचे उतारे त्यांना दिलेले आहेत. मंडल अधिकाऱ्यांनी केलेल्या चौकशीच्या कागदपत्रांच्या प्रतीही त्यांना देण्यात आल्या असून त्यांची पोहोच आहे. यापूर्वी तीन वेळा त्यांना सर्व अभिलेख पाहणीकरता उपलब्ध करून देण्यात आले व त्यांच्या मागणीनुसार त्यातील कागदपत्रांच्या प्रती देण्यात आल्या. प्रथम अपील न करता त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. गाव अभिलेखात झालेल्या नोंदी पुर्नविलोकनात

घेण्याबाबत सक्षम अधिकाऱ्यांकडे अहवाल सादर करण्यात आलेला आहे. या सर्व बाबींची कल्पना श्री.पोहरे यांना असूनही कार्यवाहीविषयक पत्रव्यवहार ते वारंवार करीत असतात, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, आंबेगाव तहसील कार्यालय, ता.आंबेगाव, जि.पुणे श्री.प्र.सु.पाटील यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. ते विचारात घेता त्यांनी माहिती देण्याबाबत योग्य कार्यवाही केली आहे.

वारंवार तच माहितीसाठी व प्रशासकीय कार्यवाहीसाठी अर्ज करून सर्व यंत्रणांवर कामाचा ताण वाढविणे हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा योग्य वापर नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेखाचे अवलोकन करून माहिती प्राप्त करून घेता येईल.

## आदेश

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.१९ .४.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अनिल बाबुराव हसुरे
मु.पो.क।। सांगाव, ता.कागल, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव/चेअरमन,
श्री दत्त विविध कार्यकारी सहकारी विकास सेवा सोसायटी लि.,
मु.पो. कवटेगुलंद, ता शिरोळ, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०१५/ २००९ / ~~पुणे~~ कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. अनिल बाबुराव हसुरे
मु.पो.क।। सांगाव, ता.कागल, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर
तर्फे प्रतिनिधी श्री. गणेश देशमुख, कनिष्ठ लिपिक

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव/चेअरमन,
श्री दत्त विविध कार्यकारी सहकारी विकास सेवा सोसायटी लि.,
मु.पो. कवठेगुलंद, ता शिरोळ, जि. कोल्हापूर श्री. ए. ए. ककमरे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.९.२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.१०.२००९ |
| ५ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

एका शेतकऱ्याला कर्जमाफी न मिळण्याची कारणे व अनुषंगिक माहिती जन माहिती अधिकारी तथा सचिव/चेअरमन, श्री दत्त विविध कार्यकारी सहकारी विकास सेवा सोसायटी लि., कवठेगुलंद यांनी दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. अनिल बाबुराव हसुरे यांनी केली. संस्थेने राजकीय द्वेषापोटी सूडबुध्दीने संबंधित व्यक्तीला कर्जमाफी नाकारली असल्याची तक्रार श्री. हसुरे यांनी केली.

श्री. हसुरे यांनी अन्य व्यक्तीच्या कर्जमाफीच्या संदर्भातील व त्यातही आर्थिक स्वरूपाची माहिती मागितली होती. संबंधित शेतकऱ्याला कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या बँक निरीक्षकांनी सर्व माहिती पूर्वीच दिली आहे. कर्जमाफीबाबतची माहिती आपल्या संस्थेच्या सर्व सभासदांना देण्यात आली असून श्री. हसुरे हे संस्थेचे सभासद नसल्यामुळे त्यांना माहिती नाकारली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सचिव/चेअरमन, श्री दत्त विविध कार्यकारी सहकारी विकास सेवा सोसायटी लि., कवठेगुलंद श्री. ए. ए. ककमरे यांनी पूरक कागदपत्रांसह केले. याच कारणावरुन अपील फेटाळले असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, जयसिंगपूर, ता. शिरोळ श्री. बी. एस. कटरे यांनी नमूद केले. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. 28 APR 2010

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रमेश पांडुरंग जाधव
जुना समडोळी रोड, अमर महाराष्ट्र चौक, मु.पो.सांगलीवाडी,
ता.मिरज, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण संचालक,
मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र शासन, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण,
कोल्हापूर विभाग, राजाराम महाविद्यालय परिसर विद्यानगर, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०१७/२००९/सांगली +९५४/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०१० (अ.क्र.२०१७) |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण संचालक,
मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र शासन, पुणे डॉ.आर.किर्दक

**जन माहिती अधिकारी** तथा विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण,
कोल्हापूर विभाग, राजाराम महाविद्यालय परिसर विद्यानगर, कोल्हापूर डॉ.बी.बी.कदम

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३१.८.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१.११.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

चिंतामणराव व्यापार महाविद्यालय, सांगली येथे लिपिक पदासाठी झालेल्या मुलाखतीनंतर आपल्याला तात्पुरती नेमणूक देण्यात आली. आपल्याबरोबर नेमलेल्या अन्य दोन लिपिकांना सेवेत ठेवून आपल्याला कमी केले. त्याबाबत आपण महाविद्यालय व विद्यापीठ न्यायाधीकरण, कोल्हापूर यांच्याकडे दावा दाखल केला असून त्या अनुषंगाने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, राजाराम महाविद्यालय परिसर, विद्यानगर, कोल्हापूर यांच्याकडून मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.रमेश पांडुरंग जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपिलात केली आहे.

श्री.जाधव याच विषयासंबंधात सातत्याने अर्ज व अपिले करीत असतात. ते खुल्या प्रवर्गातील असून ती राखीव जागा असल्यामुळे राखीव प्रवर्गातील व्यक्तीची नेमणूक करण्यात आली आहे. वेळोवेळी त्यांना याबाबतची माहिती देण्यात आली आहे. प्रथम अपिलाच्या सुनावणीला ते हजर राहिले नाहीत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, राजाराम महाविद्यालय परिसर विद्यानगर, कोल्हापूर यांनी केले.

याच विषयासंदर्भात श्री.जाधव यांच्या अन्य अपिलांत (अपील क्रमांक/४११ /४८८ /४१२/सांगली, दि.१८.१२.२००९) आयोगाने पूर्वी आदेश दिले असल्याचे त्यांनी नमूद केले. अ.क्र.४८८ चिंतामणराव व्यापार महाविद्यालयाकडे केलेले असून, अ.क्र.२०१७/२००९ /सांगली यात तीच मागणी अन्य सार्वजनिक प्राधिकरणाकडे केलेली आहे. श्री.जाधव यांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणेच्या तृतीय श्रेणीतील कर्मचाऱ्यांची नावे, नेमणुकीच्या वेळची त्यांची

शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता या माहिती संदर्भात आयोगाकडे दि.१२.३.२००९ रोजी आणखी एक अपील (क्र.९५४/सांगली) केले आहे. अपील क्र.४११ व ४१२ मधील माहितीची मागणी हीच आहे, असे कागदपत्रांवरून स्पष्ट होते. पूर्वीच निर्णय झालेल्या विषयासंदर्भात पुन्हा अर्ज व अपील करण्याची अपीलकर्त्याची कृती माहितीच्या अधिकाराच्या योग्य वापराची निदर्शक नाही.

व्यक्तिगत वादाच्या स्वरूपातील विषयांबाबत व माहिती मिळाल्यानंतरही सातत्याने अर्ज व अपिले करण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही. याबाबत त्यांना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२९.४.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुरेश जोतीबा करडे
मु.पो.कोळिंद्रे, ता. आजरा, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक
(साखर), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
आजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि.,
गवसे, ता. आजरा, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०२१ / २००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. सुरेश जोतीबा करडे
मु.पो.कोळिंद्रे, ता. आजरा, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक
(साखर), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर तर्फे प्रतिनिधी श्री. डी. एस. साळुंखे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.७.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३.८.२००९, २.९.२००९, १३.११.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५,९.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.१०.२००९ |
| ६ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

ऊस तोडणीच्या रकमेच्या संदर्भात मागितलेली माहिती न मिळाल्याची तक्रार अपीलकर्ता श्री. सुरेश जोतीबा करडे यांनी केली.

शुल्क भरुन माहिती घेऊन जाण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, आजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., गवसे, ता. आजरा यांनी अपीलकर्त्यास विहित मुदतीत कळविले होते. त्यानुसार शुल्क भरल्यानंतर जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली. परंतु काही मुद्दयांची माहिती अधिक नेमकेपणाने व तपशीलवार देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, आजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., गवसे, ता. आजरा यांनी माहिती दिली, परंतु ती मिळाली नसल्याचे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, आजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., गवसे, ता. आजरा यांनी दिलेल्या माहितीची प्रत आपल्याला सादर केली आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री. डी. एस. साळुंखे यांनी संबंधित माहितीच्या प्रतीसह नमूद केले. ते लक्षात घेता जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, आजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., गवसे व अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी योग्य कार्यवाही केलेली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. 28 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुनील मधुकर जगताप
२११, मुंढवा, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०२४+२०२५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुनील मधुकर जगताप
२११, मुंढवा, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री.प्रशांत शेळके

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे डॉ.दीपा भोसले

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२३.१०.२००७ व २०.२.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | उत्तर दिले नाही. |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.८.२.२००८ व ३.४.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | आदेश दिला नाही. |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

पुनर्वसना संदर्भातील दोन अर्जदारांच्या अर्जासोबतच्या कागदपत्रांच्या प्रतीची मागणी आपण केली होती. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, जिल्हा पुनर्वसन कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांनी माहिती दिली नाही, अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हधिकारी कार्यालय, पुणे यांनी आदेश देऊनही व तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांना वारंवार भेटूनही तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, जिल्हा पुनर्वसन कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री.एन.व्ही.शेळकंदे यांनी माहिती दिली नाही. माहिती निःशुल्क व विनाविलंब मिळावी व जन माहिती अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.सुनिल मधुकर जगताप यांनी केली.

पुनर्वसनासंबंधीचे अभिलेख अद्ययावत नसल्याचे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, जिल्हा पुनर्वसन कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे डॉ.दीपा भोसले व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हधिकारी कार्यालय, पुणे श्री.प्रशांत शेळके यांनी केले. श्री.जगताप यांच्या मागणीतील श्रीमती शांताबाई मधुकर जगताप यांच्याबाबतची धारिका आता उपलब्ध झाली असून त्यामधील टिपणीतील तहसीलदारांचा अहवाल आदींच्या प्रती देण्याची व्यवस्था करीत आहोत, असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, जिल्हा पुनर्वसन कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे डॉ.दीपा भोसले यांनी नमूद केले.

अपीलकर्ता यांच्या अर्जावर केलेली कार्यवाही, माहितीबाबत उत्तर देण्यास झालेला विलंब याबाबतचा खुलासा तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, जिल्हा पुनर्वसन कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे डॉ.दीपा भोसले यांनी आयोगाला १५ दिवसांत शास्तीबाबतच्या म्हणण्यासह सादर करावा, असे आयोगाचे आदेश विद्यमान जन माहिती अधिकारी तथा

तहसीलदार, जिल्हा पुनर्वसन कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हधिकारी कार्यालय, पुणे श्री.प्रशांत शेळके यांनी त्यांना कळवावेत, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पुनर्वसन, जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय, पुणे श्री.एन.व्ही.शेळकंदे यांनी २९.३.२०१० च्या पत्रान्वये सविस्तर खुलासा पूरक कागदपत्रांसह सादर केला. 'जिल्हाधिकारी, पुणे याच्याकडील आदेश क्र.मह/आस्था /आरआर/५३९/०७, दि.५.६.२००७ अन्वये तहसीलदार, संजय गांधी योजना, पुणे शहर या पदावर माझी नेमणूक झालेली होती व दि.८.६.२००७ रोजीपासून मी सदर पदावर कार्यरत होतो. तदनंतर माझ्याकडे जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने तहसीलदार, पुनर्वसन या पदाचा अतिरिक्त कार्यभार सप्टेंबर महिन्यात देण्यात आला. तेव्हापासून मी माझे मूळ तहसीलदार, संजय गांधी, पुणे शहर हे कामकाज पाहून पुनर्वसनाचेही कामकाज पाहत होतो.

'दि.२३.१०.२००७ रोजी अर्जदार श्री.जगताप यांनी माहिती अधिकारात दिलेला अर्ज हा वीर बाजी पासलकर प्रकल्पाचे संबंधित संकलनाचे लिपिक श्री.नलावडे व अव्वल कारकून श्री.ताते यांनी माझ्या निदर्शनास आणून दिलेला नाही. कारण संबंधित अर्ज माझ्याकडे आला असता तर त्यावर माझी दाखल तारीख मी घातली असती. सदर अर्जावर संबंधित लिपिक व थेट जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांच्याच स्वाक्षरी आहेत.

'अर्जदार श्री.जगताप यांना सदरच्या अर्जाचे उत्तर संबंधित अव्वल कारकून व लिपिक यांनी माझ्याकडे दि.१९.११.२००७ रोजी स्वाक्षरीस आणले, त्यावेळी त्यांना मला हा अर्ज पूर्वी का दाखविला नाही, असे विचारले असता, या कार्यालयात माहिती उपलब्ध नाही व ती तहसीलदार, दौंड यांच्याकडे मिळेल हे पत्र अर्जदार यांना क्र.जिपुअ/वी.बा.पा./३५०/२००७, दि.१९.११.२००७ रोजी माझ्या सहीने दिले.

'अर्जदार श्री.जगताप यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे दि.८.२.२००७ रोजी अपील केलेचे दिसून येते. सदर अपिलाचे सुनावणीस जन माहिती अधिकारी म्हणून मला बोलविण्यात आले नाही वा सुनावणीची नोटीसही मला दिलेली नाही. तसेच संबंधित अपिलाचा झालेला निर्णयही माझ्या निदर्शनास सबंधित लिपिक व अव्वल कारकून यांनी आणून दिलेला नाही. परंतु संबंधित संकलनाचे अव्वल कारकून व लिपिक यांनी अर्जदार यांना दि.२०.२.२००८ रोजी पान नं. १ ते १२३ पानांची माहिती दिलेली आहे व त्याची पोहोच आहे.

'अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, पुणे यांनी त्यांचे कार्यालयातील मंडल अधिकारी श्री.हिरतोड यांना दौंड येथे जाऊन तलाठी दप्तर व तहसीलदार कार्यालयातून माहिती घेऊन अर्जदार यांना उपलब्ध करून देण्याबाबत दि.२८.३.२००८, क्र.जिपुअ/विबापा/४५४/२००८ अन्वये कळविले होते. त्या अनुषंगाने जमा केलेली माहिती अर्जदार श्री.जगताप यांना दि.१६.४.२००८ रोजी समक्ष दिलेली आहे.

'तसेच दिनांक २१.२.२००८ रोजी (अ.क्र.२०२२)माहितीच्या अधिकारात माहिती मिळण्याकरिता केलेला अर्ज संबंधित लिपिक सौ.काकडे यांनी माझ्या निदर्शनास आणलेला नाही व त्या अर्जावर माझी दाखल तारीखही नाही. सदरचा अर्ज पाहिला असता त्यावर अव्वल कारकून यांनी 'माहिती सत्वर द्यावी' असाही शेरा मारलेला आहे, असे सदरचा अर्ज पाहिल्यानंतर दिसून आले आहे. माझ्याकडे अर्जच आला नसल्याने मी माहिती देऊ शकलो नाही.

'माझ्याकडे पुनर्वसन शाखेचा अतिरिक्त कार्यभार होता. परंतु माहितीच्या अधिकारातील अर्ज / इतर टपालही मला न दाखविताच संबंधित लिपिक व अव्वल कारकून यांच्याकडून जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांच्याकडे जात होते. तरीही दि.१९.११.२००७ रोजी अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जावर उत्तर देण्यात येऊन, अपिलीय प्राधिकारी यांनी आदेश दिल्याप्रमाणे संपूर्ण माहिती दिलेली आहे. त्यामुळे या अर्जाची माहिती देण्याकामी माण्याकडून कोणत्याही प्रकारची कुचराई झालेली नाही' असे या खुलाशात श्री.शेळकंदे यांनी नमूद केले आहे.

श्री.शेळकंदे यांनी नमूद केलेल्या बाबी लक्षात घेता जिल्हा पुनर्वसन अधिकारी, पुणे यांच्या कार्यालयात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार कोणतीही कार्यवाही होत नसल्याचे स्पष्ट होते. अर्ज जन माहिती अधिकाऱ्यांकडे न जाता थेट जिल्हा पुनर्वसन अधिकारी, पुणे यांच्याकडे पाठविले जाणे, लिपिकांनी / अव्वल कारकुनांनी अर्जदारांना उत्तर देणे व त्याबाबतची सूचना देणे, प्रथम अपिलाच्या सुनावणीला जन माहिती अधिकाऱ्यांना न बोलावणे व निर्णयाची कल्पनाही त्यांना न देणे हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीशी सुसंगत नाही, एवढेच नव्हे, तर ही हाताळणी नियमबाह्य आहे. हे अत्यंत गंभीर आहे. माहिती देण्याबाबतच्या परिस्थितीविषयीची साशंकता निर्माण करणारी अशी ही स्थिती आहे. त्याची गंभीर नोंद घेऊन संबंधितांवर त्वरित प्रशासकीय कारवाई केली जाणे व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये विहित प्रक्रियेनुसार त्याबाबतचे काम होण्याची व्यवस्था अंमलात आणणे आवश्यक आहे. जिल्हाधिकारी, पुणे यांनी स्वतः लक्ष घालून याची पूर्तता केली पाहिजे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) जिल्हा पुनर्वसन अधिकारी, पुणे यांच्या कार्यालयात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये विहित प्रक्रिया पार पाडली न जाता नियमबाह्य पध्दतीने चाललेल्या कामकाजाची चौकशी जिल्हाधिकारी, पुणे यांनी स्वतः लक्ष घालून करून संबंधितांवर कारवाई करावी. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये विहित केल्यानुसार काटेकोरपणे कार्यपध्दतीची अंमलबजावणी होईल अशी व्यवस्था करावी. जिल्हाधिकारी, पुणे यांनी याबाबतचा स्वयंस्पष्ट अनुपालन अहवाल आयोगाला दि.१०.५.२०१० पर्यंत सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.** 13 APR 2010

**प्रतः:जिल्हाधिकारी, पुणे यांना पुढील कारवाईसाठी.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. कपिल सुर्यकांत प्रभुणे
बिल्डिंग नं.९, फ्लॅट नं.१७,
आनंद पार्क, शंकरशेट रोड, पुणे-३७

**अपीलकर्ता**

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त,**
पुणे महानगरपालिका विभागीय कार्यालय क्र.३,
टिळक रोड, पुणे-३०

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
पुणे महानगरपालिका बांधकाम नियंत्रण विभाग,
उप आयुक्त कार्यालय क्र.३, टिळक रोड, पुणे-३०

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०२८/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ९/०४/२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४/०५/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८/०५/२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६/०६/२००९ |
| ६ | **उपस्थिती**<br>अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त,<br>पुणे महानगरपालिका विभागीय कार्यालय क्र.३<br>टिळक रोड, पुणे-३०<br>जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,<br>पुणे महानगरपालिका बांधकाम नियंत्रण विभाग, उप आयुक्त कार्यालय क्र.३<br>टिळक रोड, पुणे-३०<br>श्री.एन.व्ही.कुलकर्णी | |
| ७ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** टिळक रोड येथील क्षेत्रिय कार्यालयात दि.१५/०७/२००८ रोजी दिलेल्या तक्रारीवरिल कार्यवाहीच्या अनुषंगाने माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. कपिल सुर्यकांत प्रभुणे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.९/०४/२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता श्री. प्रभुणे गैरहजर होते. अनाधिकृत बांधकामाचे स्ट्रक्चर (लोखंडी सांगाडा) गॅस कटरच्या सहाय्याने पुणे महानगरपालिकेने काढलेले आहे. तसेच अपीलकर्त्यास पूर्वीच माहिती दिलेली आहे, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास कळविले आहे. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 9 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.किसन केरू थोरात
मु.पो.बोरीपार्धी, ता.दौंड, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,
दौंड यांचे कार्यालय, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०२८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.किसन केरू थोरात
मु.पो.बोरीपार्धी, ता.दौंड, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्री.बा.वा.वानखेडे

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,
दौंड यांचे कार्यालय, जि.पुणे श्री.आर.एन.पिसे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२७.११.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२६.१२.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२८.१.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१७.३.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२४.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकात एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.११.३.२०१० रोजी घेण्यात आली.

मोजणी अधिकाऱ्यांनी गावी प्रत्यक्ष मोजणी न करता, तसेच हिस्सेदार / सहगटधारक यांना मोजणीकामी नोटीस न देता पोटहिस्से पाडले. त्यामुळे हिस्सेदारांना पाठविलेल्या नोटिशीच्या प्रती व अनुषंगिक माहती आपण जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, दौंड, ता.दौंड, जि.पुणे यांच्याकडे मागितली होती. परंतु त्यांनी योग्य माहिती दिली नाही, व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलाची योग्य दखल घेतली नाही. मोजणी व फाळणीबारा आपल्याला मान्य नसून त्याबाबतच्या नकला न देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.किसन केरू थोरात यांनी केली.

मोजणी व फाळणीबारा याबाबतचे अपीलकर्त्याचे आक्षेप हा माहितीच्या अधिकाराबाहेरील विषय असून त्यांच्या मूळ अर्जानुसार विहित मुदतीत त्यांना उत्तर देण्यात आले व मूळ कागदपत्रानुसार असलेली माहिती देण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, दौंड, ता.दौंड, जि.पुणे श्री.र.ना.पिसे यांनी केले.

अपीलकर्त्याना पोटहिस्सा मोजणी मान्य नसून त्याबाबत आक्षेप असल्यास त्यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील तरतुदीप्रमाणे निमताना अथवा सुपर निमताना मोजणी करण्यासाठी दाद मागावी लागेल. तसेही त्याना प्रथम अपिलाच्या निर्णय स्पष्ट केले आहे, असे

प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्री.बा.वा.वानखेडे यांनी केले.

अपिलीय प्राधिकाऱ्यांचा निर्णय योग्य असून मोजणी योग्य की अयोग्य हा विषय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२०.४.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. नारायण लक्ष्मण मिसाळ
मु. पो. काठी, (भोंगवस्ती), ता. इंदापूर, जि. पुणे

अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पूर्व, पुणे-१ — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, इंदापूर
ता. इंदापूर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०३१ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | ७.४.२०१० |
| ३. | उपस्थित<br>अपीलकर्ता - श्री. नारायण लक्ष्मण मिसाळ<br>मु. पो. काठी, (भोंगवस्ती), ता. इंदापूर, जि. पुणे<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, पूर्व, पुणे-१ श्री. अ. भि.चव्हाण<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे<br>श्री. पी. एम. वाघमारे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.१०.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२.३.२०१० |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

माहिती न मिळाल्याची व प्रथम अपिलाच्या सुनावणीची सूचना विहित मुदतीत न मिळाल्याने हजर राहता न आल्याची तक्रार अपीलकर्ता श्री. नारायण लक्ष्मण मिसाळ यांनी केली.

अपीलकर्त्यांने मागितलेली माहिती विस्तृत असून ती संकलित करण्यासाठी कार्यालयाची साधनसामुग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागणार आहे, त्यामुळे माहिती देता येणार नाही. मात्र कार्यालयात येऊन अभिलेखाची पाहणी करावी, त्यानुसार आपल्याला हव्या असलेल्या प्रती देण्यात येतील, असे अपीलकर्त्यास विहित मुदतीत कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, इंदापूर श्री. पी. एम. वाघमारे यांनी केले. अपीलकर्त्यांने विशिष्ट स्वरुपाची नेमकी माहिती मागितल्यास व अभिलेखाचे अवलोकन करुन मागणी केल्यास माहिती सशुल्क द्यावी, असे आदेश आपण प्रथम अपिलात दिले, असे अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पूर्व, पुणे-१ श्री. श्री. अ. भी. चव्हाण यांनी सांगितले.

आपल्याला जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, इंदापूर यांचे उत्तर मिळाले नसल्याचे प्रतिपादन श्री. मिसाळ यांनी केले. त्यांना पाठविलेल्या या पत्राची व जावक बारनिशीतील नोंदीची छायांकित प्रती आयोगाला सादर करण्याचे आदेश आयोगाने जन माहिती अधिकारी यांना सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, इंदापूर यांनी प्रत सादर केली. ती पाहता अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेखाचे अवलोकन करून योग्य ते शुल्क भरून माहिती घेता येईल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 29 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. मुसा महिबूब भालदार
३, सुतार कॉलनी, एमआयडीसी,
सातारा

अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
तहसील कार्यालय सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
तहसील कार्यालय सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०३५/२००९/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ९/०४/२०१० |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५/०८/२००९ |
| ४ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९/०९/२००९, २८/१०/२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२९/०९/२००९ |
| ६ | **उपस्थिती**<br>श्री. मुसा महिबूब भालदार<br>३, सुतार कॉलनी, एमआयडीसी,<br>सातारा<br><br>अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,<br>तहसीलदार कार्यालय, सातारा<br>श्रीमती शिल्पा ओसवाल (प्रतिनिधी)<br><br>जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,<br>श्रीमती शिल्पा ओसवाल (प्रतिनिधी) | |

| | |
|---|---|
| ७ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री.मुसा महिबूब भालदार यांनी तहसील कार्यालय सातारा यांच्याकडे उत्पन्नाचा दाखला व नवीन शिधापत्रिका मिळणेबाबत केलेल्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती तसेच मौजे नागेवाडी येथील गट नं. ३७३/ब/२ चा साक्षांकित ७/१२ उतारा व फेरफार क्र. ३५५,६४४ ची साक्षांकित प्रत |

## विवेचन

'मला अपिलासंदर्भातील सर्व माहिती मिळालेली असल्याने माझी काहीही तक्रार राहिली नसल्याने माझे आयोगाकडील अपील निकाली काढण्यात यावे', असे निवेदन अपीलकर्ता श्री. मुसा महिबूब भालदार यांनी दि.२५/३/२०१० च्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 9 APR 2010

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. गणपतराव राऊजी पाटील
मु.पो.टोप, ता.हातकणंगले,
जि.कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक,**
सहकारी संस्था (दूग्ध.), कोल्हापूर,
जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी,
ताराबाई पार्क, कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
कल्लेश्वर सहकारी दूध व्यावसायिक संस्था मर्या.,
टोप, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०३६/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७/०४/२०१० |
| ३ | **उपस्थित**<br>**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**<br>कल्लेश्वर सहकारी दूध व्यावसायिक संस्था मर्या.,<br>टोप, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर<br>श्री.मोहनराव निंबाळकर | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.४/०९/२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३०/१०/२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०/११/२००९ |
| ७ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मूळ माहिती अर्ज (जोडपत्र -अ) ची छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

श्री. गणपतराव राऊजी पाटील, मु.पो.टोप, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.७/०४/२०१० रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा सचिव, कल्लेश्वर सहकारी दूध व्यावसायिक संस्था मर्या., टोप यांनी दि.१९/०३/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता श्री. गणपतराव राऊजी पाटील यांचे निधन झाले असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणून दिले. सदर बाब विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 8 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. रामचंद्र लक्ष्मण शेवाळे
मु.पो. चव्हाणवाडी, पो. उत्तूर, ता. आजरा,
जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी,
कोल्हापूर, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अप्पर चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०४६ / २००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | ७.४.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी,<br>कोल्हापूर, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.९.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.११.२००९ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्या पत्नीने आपल्या विरूध्द केलेल्या अर्जाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात आपण दिलेल्या निवेदनावरील आदेशाबाबतची माहिती जाणीवपूर्वक दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. रामचंद्र लक्ष्मण शेवाळे यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात व स्वतंत्र लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

श्री. शेवाळे यांनी दिलेले निवेदन पोलिस अधीक्षक, कोल्हापूर यांच्याकडे पाठवून अहवाल मागविण्यात आला होता, तसे श्री. शेवाळे यांना कळविले. शिक्षणाधिकारी (प्राथमिक ), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालाची प्रत त्यांना दिली. पोलिस अधीक्षकांकडून अहवाल प्राप्त झाला नसल्याने तसे कळविले. संबंधित प्रकरणाची सर्व नस्ती अपीलकर्त्यास दाखविण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर यांनी दिले व अपील नामंजूर केले. याबाबत कोणतीही कार्यवाही करावयाची राहिलेली नाही, असे प्रतिपादन अप्पर चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर व अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर श्री. अजित रेळेकर यांनी केले.

अपीलकर्त्यास मागणीनुसार माहिती देण्यात आली आहे. अपीलकर्त्याने निवेदनात नमूद केलेल्या चौकशी करुन अहवाल देणे आदी बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाच्या नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे

दि. 30 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. संभाजी आबाजी गाडे
३७१/अ, रविवार पेठ, मु.पो.फलटण, जि. सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, फलटण — उत्तरवादी
ता. फलटण, जि. सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
फलटण, ता. फलटण, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०६८ / २००९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | ९.४.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** - श्री. संभाजी आबाजी गाडे<br>३७१/अ, रविवार पेठ, मु.पो.फलटण, जि. सातारा<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, फलटण — उत्तरवादी<br>ता. फलटण, जि. सातारा श्री. सतीश बागल<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,<br>फलटण, ता. फलटण, जि. सातारा श्री. संभाजी हेरवाडे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.९.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.११.२००९ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

मागणी केलेली कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, फलटण यांनी दिली नाही. शुल्कही कळविले नाही. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, फलटण जि. सातारा यांनी अपिलाची दखल घेतली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. संभाजी आबाजी गाडे यांनी केले.

श्री. गाडे यांना दि. २४.८.२००९ च्या पत्रान्वये शिधावाटपाच्या संदर्भातील तेरा मुद्दयांची माहिती, दुकाननिहाय व विशिष्ट रकान्यांमध्ये नमुनानुसार मागितली होती. माहिती पुरवठा शाखेशी संबंधित असल्यामुळे अर्ज त्यांच्याकडे वर्ग केला. पुरवठा अव्वल कारकून यांनी श्री. गाडे यांना दि. १५.९.२००९ रोजी शुल्क कळविले व अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध असल्याचे कळविले. श्री. गाडे यांनी अभिलेख अवलोकन न करता व शुल्क न भरता अपील केले. प्रथम अपिलाच्या निर्णयानंतरही पुन्हा श्री. गाडे यांना माहिती तयार असल्याचे व शुल्क भरण्याबाबत कळविले. त्यानंतर पत्रव्यवहार करुनसुध्दा श्री. गाडे यांनी शुल्क भरले नाही. त्यामुळे माहिती दिलेली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, फलटण श्री. संभाजी हेरवाडे यांनी केले.

श्री. गाडे यांचे माहिती-मागणीचे अनेक अर्ज असून वेळोवेळी त्यांना माहिती देण्यात आली आहे. प्रथम अपिलाच्या वेळीही त्यांना शुल्क भरण्याबाबत सांगण्यात आले. तथापि त्यांनी शुल्क भरले नाही. आजही माहिती तयार असून शुल्क भरल्यास त्यांना माहिती दिली जाईल, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदारा, फलटण श्री. सतीश बागल यांनी केले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी शुल्काबाबत श्री. गाडे यांना अनेकदा कळविल्याचे दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. त्यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असून विशिष्ट रकान्यांमध्ये संकलित करुन देण्याची मागणी केली आहे. अपीलकर्त्यास माहिती आवश्यक असल्यास शुल्क भरून प्राप्त करून घेता येईल. श्री. गाडे यांना पाठविलेल्या पत्राची जावक बारनिशीतील छायांकित नोंदीची प्रत आयोगाला सादर करण्याचे मौखिक आदेश आयोगाने

सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, फलटण यांनी दि. १२.४.२०१० च्या पत्रान्वये अंशी प्रत सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. 30 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. गुरूदास पांडुरंग गावडे
मु.पो. हेरे, ता. चंदगड, जि. कोल्हापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी,
(ग्रामपंचायत), ज़िल्हा परिषद, कोल्हापूर जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गट विकास अधिकारी वर्ग-१
पंचायत समिती, चंदगड, ता. चंदगड, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०७२ / २००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. गुरूदास पांडुरंग गावडे
मु.पो. हेरे, ता. चंदगड, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, कोल्हापूर जि. कोल्हापूर श्री. एम. व्ही. चौगुले

**जन माहिती अधिकारी** तथा गट विकास अधिकारी वर्ग-१
पंचायत समिती, चंदगड, ता. चंदगड, जि. कोल्हापूर श्री. एच. पी. कांबळे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.३.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.७.२००९ व १.१०.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.८.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.९.२००९ |
| ६ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

ग्रामपंचायतीकडील माहिती आपल्याला चार महिन्यांनी व तीही अपुरी व चुकीची मिळाली. तीन मुद्दयांची माहिती चुकीची असल्याचा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी दिला व योग्य माहिती आठ दिवसांत देण्याचे आदेश दि. १४.९.२००९ रोजी दिले. त्यानंतरही विलंबाने व तीही पाठपुरावा केल्यानंतर दि. ३.१०.२००९ रोजी माहिती आपल्याला मिळाली, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. गुरुदास पांडुरंग गावडे यांनी केले.

श्री. गावडे यांच्या दि. १३.३.२००९ च्या अर्जानुसार दि. १३.७.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, वर्ग-१, पंचायत समिती, चंदगड यांनी माहिती दिली. त्यानंतर पुन्हा प्रथम अपिलाच्या निर्णयानंतर दि. १.१०.२००९ रोजी माहिती दिली, असे जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. के.ए. उपाध्ये यांनी नमूद केले. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, वर्ग-१, पंचायत समिती, चंदगड श्री. एच. पी. कांबळे यांनी तीन मुद्दयांची माहिती आधी चुकीची दिली व नंतर अपिलाच्या निर्णयातील मुदतीत दिली नाही, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री. एम. व्ही. चौगुले यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे लक्षात घेता जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, वर्ग-१, पंचायत समिती, चंदगड श्री. एम. व्ही. चौगुले यांनी माहिती देण्याबाबत योग्य कार्यवाही केलेली नाही, असे स्पष्ट होते. मूळ अर्ज दि. १३.३.२००९ चा असून पूर्ण माहिती दि. ३.१०.२००९ रोजी म्हणजे विहित मुदतीपेक्षा पाच महिने दहा दिवस विलंबाने माहिती दिली आहे. त्यामुळे ते शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, वर्ग-१, पंचायत समिती, चंदगड श्री. एच. पी. कांबळे यांना रू. २५०००/- ( १७१ x २५० ) शास्ती लावण्यात येत आहे. ही शास्ती त्यांच्या मे, जून, व जुलै २०१० या महिन्यांच्या जून, जुलै व ऑगस्ट २०१० मध्ये देय असलेल्या

वेतनातून तीन समान हप्त्यांत वसूल करुन ती '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८), माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर जि. कोल्हापूर यांनी करावी व आयोगाला अनुपालन अहवाल सादर करावा.

पुणे
दि. 28 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ